Today सकाळ

पुणे, मंगळवार, २५ सप्टेंबर २०१८ | ५

# पुढच्या वर्षी लवकर या!

मोरयाचा जयघोष, बँडच्या सुमधूर सुरावटी, ढोल-ताशांसहित झांज, टिपरीचा ठेका धरत गणेशभक्तांनी श्रींस भावपूर्ण निरोप दिला. महिलांनीदेखील उत्स्फूर्त सहभाग नोंदवीत फुगड्या घालत पारंपरिक खेळ खेळले. बालगोपाळांनी ऐतिहासिक वेशभूषा परिधान करून इतिहासातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तींची आठवण जागवली. या वैभवशाली मिरवणुकीची क्षणचित्रे.



नऊ ऑगस्ट क्रांतिदिन चौक : पुण्याच्या वैभवशाली मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी चांदीच्या पालखीत विराजमान झालेला मानाचा पहिला कसबा गणपती.



## मंडई : लो. टिळक पुतळा

रविवार, ता. 23
वेळ : सकाळी 10.30 वा.
मिरवणुकीस सुरवात

पालकमंत्री, महापौरांच्या हस्ते श्रींची आरती.

रांगोळ्यांच्या पायघड्या

ढोल-ताशांचे जल्लोषपूर्ण वादन

बँडच्या सुरावटीत गणपती बाप्पाची आणि देशभक्तीपर गाण्यांची सुमधूर धून.

ऐतिहासिक वेशभूषेत लहान मुले

हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी



बेलबाग चौक : तालाच्या ठेक्यावर आणि ताशांच्या थर्रारात वादन करत ढोल-ताशा वादकांनी वातावरणात जल्लोष भरला, तर ध्वजधारींनी देखील ठेक्यावर ध्वज नाचवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



टिळक चौक : 'बाप्पा'ला निरोप देण्यासाठी कोण आलं असेल बरं!, असाच प्रश्न तर या लहान मुलाला पडला नसेल ना!

**यंदा २६ तास ३६ मिनिटे**

### विसर्जन मिरवणुकीचा कालावधी

| | |
|---|---|
| २०१७ | २८ तास ५ मिनिटे |
| २०१६ | २८ तास ३० मिनिटे |
| २०१५ | २८ तास २५ मिनिटे |
| २०१४ | २९ तास १२ मिनिटे |



बेलबाग चौक : लाडक्या बाप्पाचरणी सेवा रुजू करत असतानाच आपल्या तान्ह्या बाळाची भूक भागवणारी रणरागिणी.

फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्रामवर बाप्पांच्या छबीची असंख्य छायाचित्रे अपलोड करण्यात तरुणाईचा उत्साह.

महापौरांच्या हस्ते मंडळांच्या अध्यक्षांना मानाचा श्रीफळ प्रदान.

शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या मंडळांकडून आकर्षक सजावट रथ.

पारंपरिक वेशभूषेत महिला व पुरुष कार्यकर्ते

मानाच्या पाचही गणपतींच्या दर्शनास परदेशी नागरिकांची उपस्थिती.

ड्रोनद्वारे चित्रीकरण



लक्ष्मी रस्ता : नऊवारी साड्या नेसून डोक्यावर फेटा बांधून आलेल्या या महिलांनी लेझीमची प्रात्यक्षिके सादर करत पारंपरिक खेळाला प्राधान्य दिले.



बेलबाग चौक : पारंपरिक मल्लखांब खेळाचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे युवक.



बेलबाग चौक : लाडक्या बाप्पाला आनंदोत्सवात निरोप देण्यासाठी गणेशभक्तांनी केलेला शंखनिनाद.

शंखनिनाद

कलाकारांचा सहभाग, आदिवासी नागरिकांचा सहभाग



टिळक चौक : पारंपरिक पद्धतीने फुगड्या खेळत महापौर मुक्ता टिळक या 'बाप्पा'च्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाल्या.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि अखिल मंडई मंडळाच्या श्रींचे पांचाळेश्वर घाटावर विसर्जन.

चांदीची पालखी, फुलांचे रथ, हेमाडपंती महागणपतीची भव्य मूर्ती, वैचारिक प्रबोधनास मंडळांचे प्राधान्य.

मोबाईलच्या कॅमेऱ्यात छायाचित्रे टिपण्यात आणि व्हिडिओ शूटिंग करण्यात तरुणाई अग्रेसर.

## टिळक चौक

सोमवार, ता. 24
वेळ : दुपारी 01.06 वा.
मिरवणूक समाप्त





**जाणीव जबाबदारीची**

टिळक चौक : विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या भाविकांच्या गर्दीतून रुग्णवाहिका मार्गस्थ होताना.



**हुश्श..!! दमलो बुवा !**

डेक्कन नदीपात्र : विसर्जनाच्या दिवशी दिवस-रात्र विविध गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकीत ढोल बडवल्यानंतर सोमवारी सकाळी काहीशी विश्रांती घेणारे वादक.



**वारसा परंपरेचा**

लक्ष्मी रस्ता : कातकरी समाजाचे पारंपरिक नृत्य सादर करताना कलाकार.

मानाच्या पहिल्या तीन गणपतींचे नटेश्वर घाटावर विसर्जन.

मानाचा चौथा, पाचव्या गणपतीचे पांचाळेश्वर घाटावर विसर्जन.



टिळक चौक : हजारो दिव्यांच्या विश्वविनायक रथावर विराजमान झालेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची मोबाईलमध्ये छबी टिपताना भाविक.